Vol 3 Issue 2 March 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

## Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 2,March. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *महाराष्ट्रातील प्राचीन बौध्द अस्थी करंडक*

*अभय पाटील*

इतिहास विभाग प्रमुखए. एस्. सी. कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)ता. पलुस, जि. सांगली

***सारांशः***

महाराष्ट्रातील उत्ख्सननातून बौध्द अस्थी करंडक प्राप्त झाले आहेत. हे करंडक मनसर, पितळखोरा, सोपारा, कान्हेरी , पवनी व कोल्हापूर या ठिकाणी उत्खननामध्ये सापडले आहेत. हे करंडक पाषाण , धातू व भाजीव माती यापासून तयार केले गेलेले आहेत. या करंडकांचा कालखंड इ. स. पूर्व दूसरे ते इ. स. 5 वे शतक असा आढळतो. हे बौध्द अस्थी करंडक व्यक्ति व तत्कालीन परिस्थितीसापेक्ष निर्माण झालेचे आढळतात. बौध्द काळात शरीरावशेष व अस्थी अवशेष संरक्षणची परंपरा या ठिकाणी होती याचा प्रमुख उद्‌देश पुजा करणे व चिरंतन स्मृती कायम राहून असा होता. पाषाणयुग ते ताम्र पाषाणयुगातील मानवी जीवनामध्ये ही प्रथा चालू होती. हीच प्रथा , परंपरा बौध्द संस्कृतीने पुढे चालविली. विविध स्तूप व त्यामध्ये आढळलेले अस्थीकरंडक हे प्राचीन भारतीय संस्कृतीची स्मृतीचिन्हे आहेत. त्यावर या शोधनिबंधाव्दारे प्रकाश टाकण्याचा  प्रयत्न केला आहे.

## *प्रस्तावना*

गौतम बुध्दांना वयाच्या 35 व्या वर्षी 'दिव्यज्ञान' प्राप्तझाल्यावर त्यांनी आपले उरलेले आयुष्य लोकसेवेला व बौध्द धर्माच्या प्रचाराला वाहून दिले. 45 वर्षे सतत सेवा व प्रचारकार्य केल्यानंतर वयाच्या 80 व्या वर्षी '(इ.स.पू.487)' कुशीनगर येथे गौतम बुध्दांचे महापरिनिर्वाण (मृत्यू) झाले. बुध्दाच्या मृतदेहाचे अस्थी अवशेष त्यांच्या अनुयायांनी आठ राज्यांत वाटून देऊन त्यावर स्तूप उभारले.[1]

बौध्द धर्मात अस्थी जतन करून ठेवण्याची प्रथा या काळापासून आढळते.[2]भारतीय इतिहासात गौतम बुध्दाच्या महापरिनिर्वाणानंतर त्याच्या शरीरावशेष केलेल्या आठ भागाच्या विभाजनानंतर राजग्रह येथे मगध सम्राट अजात शत्रुने, कपिलवस्तू येथे शाक्यांनी, वेठव्दीप येथे व्यापारी श्रेष्ठीनीं व कुशीनगर येथे मल्लांनी स्तूप उभारून बुध्दाचे शरीरावशेष संरक्षित केले.[3]गौतम बुध्दाच्या अस्थी अवशेष विभाजनापूर्वी झालेल्या वैचारिक प्रसंगाचे शिल्पांकन साचीच्या व्दार तोरणावर आढळते.

मौर्यकाळात सम्राट अशोकाने 84,000 स्मारके (स्तुप) उभारल्याचे वर्णन 'महावंश' या ग्रंथात आढळते.[4] बौध्द धर्मात अस्थी संरक्षणाची परंपरा रूढ होऊन इतर महत्वपूर्ण आचार्य व्यक्तींच्या अस्थी संरक्षित केल्या जाऊ लागल्या त्याचे पुरावे अनेक ठिकाणी आढळतात. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उत्खनन झाले. त्यातील मोजक्या ठिकाणीच बौध्द अस्थी करंडक सापडले. त्यापैकी काहीचे संरक्षण झाले तर इतर अस्थी करंडक काळाच्या आहारी गेले. या सर्व पुरावशेषांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधाव्दारे केला आहे. गौतम बुध्दाच्या महापरिनिर्वाणानंतरच्या काळात लाभलेल्या परिस्थितीनुसार माती, पाषाण व धातूंच्या करंडकात अस्थी अवशेषांचे जतन करून त्यावर माती, कच्चा विटा व पाषाण यांचा वापर करून स्तुप व चैत्याची निर्मिती झाल्याचे स्पष्ट होते. 'दगडांच्या चौथऱ्यावर अर्ध्या अंडयासारखी दगडी आकृती बांधून त्यावर छत्र उभारीत. ज्या स्तूपाची पुजा करतात त्याला चैत्य म्हणतात. चैत्य (पुजेचे स्तूप) असणाऱ्या गुहेस चैत्यगृहे म्हणतात. प्रारंभी स्तूप, चैत्य व चैत्यगृहे साधी होती. मौर्येत्तरकाळात त्यांचे सौंदर्य, सजावट, आकार व आकृती यांच्यात अनेक कलापूर्ण बदल घडून आले.'

### *महाराष्ट्रात जे बौध्द अस्थी करंडक सापडले ते याप्रमाणे आहेत.*

### *1) मनसर बौध्द अस्थी करंडकः–*

महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरच्या उत्तरेस आणि रामटेकच्या पश्चिमेस असलेल्या 'मनसर' येथील टेकडीच्या उत्खननात इ. स. पूर्व 1 ले शतक ते इ. स. 7 वे शतक या कालखंडातील अवशेषाचे पुरावे प्राप्त झाले. येथील बौध्द स्तूपांच्या उत्खननात दगडातील अस्थी करंडकाचा खालचा भाग व वरचे झाकण याचे भग्न अवशेष प्राप्त झाले.

### *2) पितळखोरा बौध्द अस्थी करंडकः–*

मराठवाडा विभागातील 'औरंगाबाद' जिल्हयातील पितळखोरा लेण्यामधील स्तूपाच्या मध्यभागातील छत्रच्या खोबणीत सहा करंडक मिळाले.[7]त्यापैकी 5 स्तूप आकारात व 1 मणी आकारात आहे. या स्तूप आकारातील करंडकापैकी 3 करंडकात अस्थी अवशेष आढळून आले. हे अवशेष पितळखोरा लेणी क्र. 3मधिल स्तूपांच्या खोबणीत व अन्य 2 करंडक लेणी क्र.4  समोरील दगडाच्या खंडीत जागेत आढळून आले. प्राप्त अस्थी करंडक गार वजा स्पटिक दगडाचे आहेत. या करंडकाचे आकार विभिन्न आहेत. हे करंडक पुजले जात होते.  या प्रकारचे अवशेष कार्ले–भांजे येथील स्तूपावर, लाकडी छत्र असलेल्या खोबणीत होते. असा पुरावा सोपारा येथील दानपत्र लेखात आढळतो. भांजे येथील

चैत्यगृहातील स्तूपावर असलेल्या दुहेरी दगडी कठडयातील खोबण मुख्यतः पितळखोऱ्याप्रमाणे अस्थी करंडक ठेवण्याकरिता होता. हे स्पष्ट होते.

*3)सोपारा बौध्द अस्थी करंडकः—*

सन 1882 साली ठाणे जिल्हयातील सोपारा (शुर्पारक) येथील उत्खननात, स्तूपाच्या मध्यभागी दोन समान भागात उघडणारा दगडी करंडक आढळला.[8] करंडकाचे वरचे व खालचे झाकण मध्यभागी बरोबर जुळून ते एकमेकांवर घट्ट बसत होते. या दगडी करंडकात तांब्याचा करंडक आढळला. त्यात छोटया 8 बुध्द प्रतिमा (कोरिव) आढळल्या. तांब्याच्या करंडकामध्ये चांदीचा दुसरा एक करंडक आढळला. त्यामध्ये स्वर्णफुले, रत्ने, मणी, सोन्याच्या पत्र्यावर बुध्द मूर्तीचा छाप, गौतमपूत्र सातकर्णी दुसरा यांचे एक चांदीचे नाणे (इ.स.वी. सन 160), दुसरा एक स्पटिक करंडक, एक हिरा, काही पाचुचे तुकडे मिळाले.9 हे अवशेष बुध्दांचे असल्याशिवाय त्याचे इतके विशेषतेने जतन करणे शक्य नाही. करंडकावरील कोरिवकाम अप्रतिम आहे.

*4) कान्हेरी बौध्द अस्थी करंडकः—*

महाराष्ट्रातील पश्चिम सागरी किनारपट्टीतील ठाणे जिल्हयात असलेल्या कान्हेरी लेणी मधील क्र. 13 मध्ये असलेल्या स्तूप (इ) व स्तूप (फ) च्या मधील जागेत उत्खनन करतांना झाकणा सोबत दगडी भांडे प्राप्त झाले. 10 सन 1862 मध्ये हे पाषाण करंडक रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेत होते. कणाष्म (Laterite)सारख्या दगडापासून निर्मित या करंडकाचे झाकण अत्यंत घट्ट बसविलेले होते. या करंडकात चमच्या एवढी राख, दोन नाणी आढळली. नाण्यांचा कालखंड कळत नाही. कान्हेरी येथील येथील लेणी क्र. 23 मध्ये लहान स्तूपाच्या शेजारील खोबणीत शंख, धुळीने माखलेली 2 मृदभांडी मिळाली आहेत. [11]

येथील चैत्यगृहा समोरील स्तूपात अस्थी अवशेष असलेले दोन ताम्र करंडक, एक छोटा सुवर्ण करंडक, पाचू, मोती, धातुचे तुकडे व इसवी सन 324 चा एक ताम्रपट्ट मिळाला आहे.[12] कान्हेरी लेणी क्र. 2 समोर प्राप्त दगडी करंडकामध्ये शंख, मणी, मृण्मय अवशेष, नाणी, ताम्रकमळ, विटांचे बारीक तुकडे 30 अवशेष प्राप्त झाले आहेत.[13]

*5) पवनी बुध्द अस्थी करंडकः—*

विदर्भातील भंडारा जिल्हयातील 'पवनी' येथे एका शेतकऱ्यास शेतात खोदकाम करीत असताना 59.5 सें. मी. आकाराचा एक दगडी अस्थीकरंडक सापडला. असे चंद्रा जी. सी. यांच्या दि. 22—9—1936 च्या पत्रानुसार कळते. त्यामध्ये अस्थी अवशेष व लहान प्रतिमा होत्या अशी माहिती मिळते.[14]

पवनी या ठिकाणी 1967—1970 या काळात केलेल्या सुलेमान टेकडी स्तूपाच्या उत्खननात स्तूपाच्या मध्यभागी विटांनी तयार केलेल्या खोबणीत एक पूर्ण मृदभांडे प्राप्त झाले.[15]या मृद भांडयात मानवी अस्थी अवशेषांचे जतन केलेले आढळून आले. सदरच्या करंडक गोल, अंतर्वक्र, काठ बाहेर असलेले असा आहे. या करंडक प्राप्त झालेले अवशेष एखाद्या महत्वपूर्ण बौध्द व्यक्तिचे असावेत.

*6. कोल्हापूर बौध्द अस्थी करंडक :—*

कोल्हापूर जिल्हयातील ब्रम्हपुरी येथील इ. स. 1878—79 मधील उत्खननात इ. स. पूर्व 3 रे शतकातील बौध्द स्तूपात चौकोनी पाषाणपेटी प्राप्त झाली आहे.[16] त्या पाषाणपेटीवर एक लेख कोरला आहे. तो मौर्य काळातील ब्राम्ही लिपीत आहे. 'ब्रहस्य दनंम धमगूतेन करितम' म्हणजेच धम्मागुप्ताने केलेले ब्रम्हाचे दान असा आहे. हा करंडक इ. स. पूर्व 3 ऱ्या शतकातील असावा. असे त्याच्या रचनेनुसार स्पष्ट होते. या पाषाण पेटीत एक स्पटीकपेटी त्यात रक्षा आढळली.

*पाषाण करंडक —*

बौध्द आचार्य, महत्वाचे भिक्षू यांचे अस्थी अवशेष जपून ठेवण्याकरीता पाषाण करंडक तयार करून स्तूपामध्ये वापरलेला आढळतो. अस्थी व इतर वस्तू पाषाणसारख्या कठीण वस्तू व त्याचे संरक्षण केलेले आढळून येते. अमूल्य अस्थी अवशेषाच्या जतना करीता वापरलेला दगड सुध्दा मौल्यवान असावयास हवा व त्यास उत्तम कलाकुसरीने घडविलेले होते. हे पाषाण स्पटीक, संगमरवर सारख्या कठीण पाषाणाचा वापर करंडक निर्मितीत केलेला आढळला. हा करंडक घट्ट झाकणाचा, विविध आकाराचे, हॅन्डल असणारे तसेच दानकर्त्याच्या नावाने सुशोभित केलेले होते. मनसर, पवनी, पितळखोरा, सोपारा, कान्हेरी व कोल्हापूर येथील बौध्द अस्थी करंडक माती, पाषाण व धातूचे असल्याचे आढळते.

*धातू करंडक :—*

तांबे, सोने व चांदी या सारख्या मौल्यवान धातूचा वापर अस्थी अवशेषाच्या जतन व संरक्षणाकरीता करंडक रूपाने झालेला आढळतो. सोपारा (शुर्पारक) या ठिकाणी करंडकामध्ये तांबे, सोने व चांदी धातूचे करंडक प्राप्त झाले आहेत. सदर करंडकगौतम बुध्दांच्या अस्थी अवशेषाच्या किंवा तेवढयाच महत्वपूर्ण वस्तूच्या संरक्षणार्थ निर्माण केले. असे के. एन्. दिक्षीत यांनी नमूद केले आहे.

*मृदभांड करंडक :—*

उच्च प्रतीच्या भाजल्या मातीचे मृदभांड करंडकाची प्राप्ती पवनी, कन्हेरी व मनसर येथे झाली. पवनी येथील करंडक इ. स. वी सन पूर्व पहिल्या शतकातील लाल चमकदार मृदभांडयाचे आहेत. कन्हेरी येथील करंडक इ. सवी सन 4—5 व्या शतकातील तर मनसर येथील करंडक भाजक्या मातीचे आहेत.

*निष्कर्ष*

बौध्द अस्थी करंडक हे व्यक्ति व परिस्थिती सापेक्ष निर्माण झाल्याचे स्पष्ट होते. बुध्दपूर्व काळात शरीरावशेष व अस्थी अवशेष

संरक्षणाची परंपरा या ठिकाणी होती. शरीरावशेष जतन करण्याचा मुख्य उद्देश त्याची पुजा अर्चा व चिरंतन स्मृती असा दुहेरी होता. पाषाण युगाने ताम्रपाषण युगातील मानवी जीवनामध्ये ही प्रथा परंपरा चालू होती. हीच परंपरा बौध्द संस्कृतीने पुढे चालविली. विविध ठिकाणी प्राप्त स्तूप व यामध्ये आढळलेले अस्थी करंडक प्राचीन भारतीय संस्कृतीची स्मृती चिन्हे आहेत.

### *संदर्भ सूची*

1. देशमुख मा. म. नागपूर 12.1991 पान नं 115 ' प्राचीन भारताचा इतिहास' विश्वभारती प्रकाशन धनवटे चेम्बर्स, सीताबर्डी
2.महानिर्वाणसूक्त उपाध्याय वासुदेव प्राचीन भारतीय स्तूप गुहा व मंदिरे , पटणा 1989 पान नं 8 कनिंगधम्. अ. भिलसा टोप्सा ,लंडन 1854 पान नं 29
3.कनिंगधम्. अ.उपरोक्त , पान नं.29 उपाध्याय वासूदेव पान नं. 13
4. कनिंगधम्. अ.उपरोक्त , पान नं.29 उपाध्याय वासूदेव पान नं. 13
5. कनिंगधम्. अ.उपरोक्त , पान नं.22 उपाध्याय वासूदेव पान नं. 23
6.' नवभारत' नागपूर शनिवार दि. 5 / 1 / 2000
7. देशपांडे म. न. ' एन्शयट इंडिया'व्हॉल्युम –15 नवी दिल्ली 1986 पान नं. 88,89 मित्र देबला , बुध्दिष्ट मॅन्यूमेंटन्स , कोलकत्ता –1980 पान नं. 172 मोरे मा. श. ' महाराष्ट्रातील बुध्द धर्माचा इतिहास' – पुणे पान नं 5, 99
8. रॉयल एसियाटिक सोसायटी व्हॉल्युम –15 1881, 1882 पान नं 307 मोरे मा. श. उपरोक्त पान नं. 39,40
9.मित्र देबला ,उपरोक्त पान नं. 188,189
10. रॉयल एसियाटिक सोसायटी व्हॉल्युम –15 नवी दिल्ली उपरोक्त पान नं. 307 मोरे मा. श. उपरोक्त पान नं. 39,40
11. मित्र देबला ,उपरोक्त पान नं. 167
12.रॉयल एसियाटिक सोसायटी व्हॉल्युम –6 1862 पान नं 160
13. मित्र देबला ,उपरोक्त पान नं. 168
14. देव शा. भा. व जोशी जे. पी. ' पवनी एक्साव्हेशन ' 1967 –70 पान नं. 3
15. उपरोक्त पान नं 106
16. अग्रवाल वा. ध. ' सारनाथ ' नवी दिल्ली , 1992 पान नं. 6

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net